सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आजादी का अमृत महोत्सव
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी - (०२२) २२६२६००७ दुरध्वनी - (०२२) २२६२२२४७
ईमेल- directorayurvedmaha@gmail.com संकेतस्थळ- www.mahaayush.in

क्र.आसंमुं/स.अनु/आमना/स.से.प.भ./सहप्रामाप्र/आयु-७(४)/२०२५/१९०३०३० 20 NOV 2025

प्रति,
प्रभारी प्राचार्य,
आयुर्वेद महाविद्यालय,
नाशिक

विषय :- आयुर्वेद महाविद्यालय, नाशिक येथील शासनमान्य अध्यापकीय पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता देण्याबाबत तसेच जाहिरातीचा मसुदा प्रमाणित करुन देण्याबाबत.

संदर्भ :- १. आपले संस्थेचे पत्र क्र. ७०५ , दि.२७.०५.२०२५, पत्र क्र. ७१२, दि.२९.०५.२०२५
२. सहाय्यक संचालक आयुष मुंबई यांचे पत्र क्र. ससंआपु/ अनुदान/ नाशिक/ अध्यापक नियुक्ती / सरळसेवा / २०२५/१२०२ दि.०६.०६.२०२५
३. शासन पत्र क्र. आयुष- २०२५/ प्र.क्र. ११६/२५/१२१३३६६/ आयू २ दि.२०.०८.२०२५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भित पत्र क्र. (१) व (२) बाबत आपणांस कळविण्यात येते की, शासन पत्र क्र.आयुष-२०१९/प्र.क्र.९०/१९/आयु-२, दि.२१.०४.२०२३ अन्वये, शासनाने शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्थांमधील (सरळसेवा कोटयातील पदभरती) गट अ मधील प्राचार्य / शिक्षक संवर्गातील रिक्त असलेल्या १२९ रिक्त पदांच्या ८० टक्के रिक्त पदे तसेच, गट ब मधील शिक्षक / शिक्षकेतर संवर्गातील रिक्त असलेल्या १४० रिक्त पदांच्या ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता प्रदान केली आहे.

२. त्यानुसार आपल्या संस्थेतील संदर्भित पत्र क्र. (१) अन्वये, प्रस्तावित केलेल्या सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील दि.२०.०३.२०२३ रोजी रिक्त असलेल्या एकुण रिक्त पदांच्या ८० % च्या मर्यादेतील खाली नमुद केलेल्या पदांच्या सरळसेवा पदभरतीस, म.आ.वि.वि. नाशिक व मागासवर्ग कक्ष, कोकण भवन, नवीमुंबई यांनी प्रमाणित केलेली बिंदुनामावली विचारात घेता, संस्थेचे विनंतीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(अ) सहयोगी प्राध्यापक :-

| अ. क्र. | पदनाम | विषय | शासनमान्य मंजूर पद |
|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक | पंचकर्म | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | स्त्रीरोग प्रसुतीतंत्र | ०१ |

म.आ.वि.वि. नाशिक व मागासवर्ग कक्ष यांनी प्रमाणित केलेली बिंदुनामावलीनुसार संस्थेने प्रस्तावित केलेल्या भरावयाच्या पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबत तपशील खालीलप्रमाणे:

| प्रवर्ग | अ.जा S.C. (१३%) | अ.ज. S.T. (७%) | वि.जा. (अ) VJ-A (३%) | भ.ज. (ब) NT-B (२.५%) | भ.ज. (क) NT-C (३.५%) | भ.ज. (ड) NT-D (२%) | इ.मा.व. (१९%) OBC | वि.मा.प्र. (२%) SBC | सा.व. शै. मा. (१०%) SEBC | आ.दु.घ (१०%) EWS | अराखीव Un-resereved (२८%) | एकुण (१००%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | २ |
| सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | २ |

(ब) सहाय्यक प्राध्यापक :-

| अ. क्र. | पदनाम | विषय | शासनमान्य मंजूर पद |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक | संहिता सिध्दांत | ०१ |
| २ | सहाय्यक प्राध्यापक | कायचिकीत्सा | ०१ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | पंचकर्म | ०१ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक | स्त्रीरोग व प्रसुतीतंत्र | ०१ |

म.आ.वि.वि. नाशिक व मागासवर्ग कक्ष, कोकण भवन, नवीमुंबई यांनी प्रमाणित केलेली बिंदुनामावलीनुसार संस्थेने प्रस्तावित केलेल्या भरावयाच्या पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबत तपशील खालीलप्रमाणे:

| प्रवर्ग | अ. जा S.C. (१३%) | अ.ज. S.T. (७%) | वि.जा .(अ) VJ-A (३%) | भ.ज. (ब) NT-B (२.५%) | भ.ज. (क) NT-C (३.५%) | भ.ज. (ड) NT-D (२%) | इ.मा. व. (१९%) OBC | वि.मा.प्र .(२%) SBC | सा.व. शै. मा. (१०%) SEBC | आ.दु. घ (१०%) EWS | अराखीव Un-resereved (२८%) | एकुण (१००%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | १ | - | - | - | - | २ | - | - | - | - | ४ |
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | १ | - | - | - | - | ३ |
| महिला | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |

३. तसेच संदर्भित पत्र क्र.(१) सोबत जोडलेल्या जाहिरातीच्या मसुद्यामध्ये शासन नियमानुसार यथायोग्य बदल करण्यात आला असून, सुधारीत मसुदा सोबत जोडला आहे. सुचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या जाहिरातीच्या सुधारीत मसुद्यामध्ये, संस्था स्तरावर बदल करण्यात येऊ नये.

४. त्याचप्रमाणे सुचित करण्यात येते की, सद्यस्थितीमध्ये, राज्य निवडणुक आयोगाने महाराष्ट्र राज्यामध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागू केली आहे. आचारसंहितेचे कालावधीमध्ये, सरळसेवा पदभरतीचे अनुषंगाने कोणतीही कार्यवाही किंवा भरती प्रक्रियेचा कोणताही टप्पा सुरु करता येणार नाही. त्यामुळे, आचारसंहितेचा कालावधी संपुष्टात आल्यानंतरच, पदभरतीचे अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द करणे किंवा अन्य कार्यवाही करण्याची दक्षता संस्थास्तरावर घेण्यात यावी.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम) २०२१ नुसार निर्गमित उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. ९४/१९/ विशि-१, दि.११.०४.२०२२ मध्ये संवर्गनिहाय आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबतची नमुद कार्यपध्दती तसेच, शासन सेवा प्रवेश नियम २०१३, दि.२६ जुलै २०१३ मध्ये नमुद तरतुदींनुसार, सरळसेवा पदभरती प्रक्रिया राबविण्याचे अधिन राहून, मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेने भरावयाची पदे वेळोवेळीच्या प्रचलित नियमांनुसार पात्र उमेदवारांमधून निवडीकरीता, शासनाने शासन निर्णय क्र. एडीआर-२०१७/ प्र.क्र.०५/ १७/ आयु-२, दि.०७.१०.२०२४ अन्वये निवडसमिती गठीत केली आहे. त्यानुसार, सरळसेवा पदभरतीची संपुर्ण प्रक्रिया संचालक आयुष किंवा संचालक आयुष यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीमध्ये राबविण्याचे अधिन राहून, मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. वरीलप्रमाणे प्रदान करण्यात आलेली मान्यता ही संस्थेने सादर केलेली कागदपत्रे व माहितीचे आधारे प्रदान करण्यात येत आहे. संबंधित पदाकरीता निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारांचे कागदपत्रे खरे असल्याची

३/-

खातरजमा संस्था स्तरावर करुनच प्रस्ताव सादर करावा. संबंधित माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा काहीही तक्रार उद्भवल्यास किंवा पदभरतीचे अनुषंगाने भविष्यात कोणतेही न्याय. प्रकरण / तक्रारी / आक्षेप उद्भवल्यास त्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. याची आपण नोंद घ्यावी. तसेच, त्यामुळे, सदरची सरळसेवा पदभरती शासनाचे विहित नियमातील तरतुदींनुसार निष्पक्षरित्या राबविण्याची दक्षता घ्यावी.

Signed by
Raman Ramchandra Ghungralekar
Date: 18-11-2025 16:13:22
(वैद्य रामन घुंगराळेकर)
संचालक आयुष,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत, उक्त बाब माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना माहितीस्तव.

२) सहाय्यक संचालक आयुष, नवी मुंबई यांचे कार्यालय, नवी मुंबई यांना पुढील उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित. तसेच कळविण्यात येते की, संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची प्रचलित शासन नियमानुसार आपल्या स्तरावर तपासणी करुन, आपले कार्यालयाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय व विहित शिफारशीसह परीपुर्ण प्रस्ताव मान्यतेकरीता संचालनालयास सादर करावा.

३) निवडनस्ती.

